Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३३] मंगळवार, नोव्हेंबर १८, २०२५/कार्तिक २७, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम २५ खालील अधिसूचना**

**कन्हान नदी प्रकल्प (कोच्छी बॅरेज)** भूसंपादन प्रकरण क्र. ९-अ-६५-२०२१-२२, मौजा-खैरी ढालगाव (गावठाण), ता. सावनेर, जि. नागपूर येथील कन्हान नदी प्रकल्पाच्या (कोच्छी बॅरेज) बाधित क्षेत्राकरीता (बाधित गावठाण) भूसंपादन.

क्रमांक मं.अ.-खैरी ढालगाव (गा.)-मुदतवाढ-उप(भू.क्र.१)-विपाविम-कावि-६४३-२०२५.—

ज्याअर्थी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ मध्ये नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, भूमी संपादनाची संपूर्ण कार्यवाही व्यपगत होईल,

परंतु, समूचित शासनाला, त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे.

परंतु, आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

कन्हान नदी प्रकल्प (कोच्छी बॅरेज) या प्रकल्पाचे काम ९०% पूर्ण झालेले असून जून २०२६ पर्यंत काम पूर्ण होऊन येणाऱ्या पावसाळयात पाणी साठवणे अपेक्षित आहे. बधित होणारे मौजा- खैरी (ढालगाव) गावठाण, ता. सावनेर, जि. नागपूर भूसंपादन प्रकरण सद्यस्थितीत जर प्रकरण रद्द केले तर सदर प्रकरणात पुन्हा कलम ११ ची प्रारंभिक अधिसूचना पासून प्रक्रिया सुरु करावी लागेल. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होऊन भूसंपादन प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअर्थी, मौजा - खैरी ढालगाव, ता. सावनेर, जि. नागपूर च्या निवाडयाकरीता उर्वरित रक्कमेची मागणी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प विभाग, नागपूर यांनी महामंडळ कार्यालयास सादर करण्यात आलेली आहे. परंतु शासनाकडून निधी प्राप्त होण्यास विलंब होवू शकते, यामुळे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प विभाग, नागपूर यांचे विनंतीवरुन सदर प्रकरण निधी अभावी व्यपगत होवू नये म्हणून भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ अन्वये समूचित शासन असलेले जिल्हाधिकारी, या नात्याने प्रकरणात १२ महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरुन उक्त प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्याच्या कालावधीत ६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ मंजूर करत आहे. तसेच आवश्यकता भासल्यास पुढे ६ (सहा) महिन्यांची मुदतवाढ देण्यात येईल.

नागपूर :
दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५.

**डॉ. विपीन,**
जिल्हाधिकारी, नागपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.